**वाचले** -

1. सह.आ (द) नों. भेषज नेमणूक/७४-१३/१८. दि. २९/१०/२०१३.
2. मा. स्थायी समिती ठराव क्र. ६०४५ दि. १३/०२/२०१४.
3. शासन निर्णय क्र. प्रानिमं१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ. दि. ०५/०६/२०१४.
4. दि. ३०/०६/२०१४ रोजीचा सभावृत्तांत.(निवड यादी)
5. मा. आयुक्त यांचेकडील दि. ३१/०७/२०१४ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/०१/कावि/ ८८९ /२०१४.
दि. ०१/०८/२०१४.

**विषय - ' फार्मासिस्ट ' या संवर्गातील पदे दरमहा एकत्रित मानधनावर हंगामी स्वरुपात सहा महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपाच्या नियुक्तीबाबत.**

**आदेश,**

शासनाचे अन्न व औषध विभागाकडील वाचले क्र. १ चे परिपत्रकान्वये मनपा रुग्णालयात पुरेशा प्रमाणात रजिस्टर्ड फार्मासिस्टची नियुक्ती करणेबाबत कळविलेनुसार वैद्यकिय विभागाकडून दि १९/०५/२०१४ अन्वये वर्तमानपत्रे व मनपाचे संकेतस्थळावर फार्मासिस्ट अभिनामाची एकूण १३ पदे एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात सहा महिने कालावधीसाठी भरणेबाबत जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरची पदे एकत्रित मानधनावर भरणेसाठी मा. स्थायी समितीने वाचले क्र. २ अन्वये मान्यता दिलेली आहे.

वाचले क्र. ३ चे शासन निर्णय दि. ०५/०६/२०१४ अन्वये गट क चे उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेणेबाबत कळविलेनुसार दि. ३०/०६/२०१४ रोजी मनपाचे वायसीएम रुग्णालय येथे उपस्थित असलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात आली होती. लेखी परीक्षेमधून गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उम्देवारांची आरक्षण निहाय निवड यादी केली असून त्यांची दवाखाना /रुग्णालयामध्ये नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सबब गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या निवड यादीतील उमेदवारांना सहा महिने कालावधीसाठी तसेच जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अनुभव कालावधीचा विचार करून दरमहा एकत्रित मानधन रक्कमेवर खालील नमुद उमेदवारांना त्याचे नावापुढे नमुद केलेल्या अनुभव कालावधीनुसार एकत्रित मानधनावर विहीत केलेल्या दवाखाना / रुग्णालयात खालील अटी व शर्तीचे अधीन राहून आदेशाचे तारखेपासून सहा महिने कालावधीसाठी पूर्णतः तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देणेत येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | प्रतिमाह एकत्रित मानधन र.रु. ( अनुभवानुसार) | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. कदम सौरभ शरदराव | खुला | १००००/- | च-होली दवाखाना |
| २ | श्रीमती माळी स्नेहांकीता बापुसो. | खुला | १००००/- | वायसीएम रुग्णालय |
| ३ | कु. खुळे वर्षा भास्कर | खुला (ओबीसी) | १००००/- | काळेवाडी दवाखाना |
| ४ | श्रीमती निकोले कुमुदिनी गजानन | खुला (ओबीसी) | १००००/- | तालेरा रुग्णालय |
| ५ | श्रीमती शिंदे पल्लवी पांडुरंग | खुला (ओबीसी) | १००००/- | तालेरा रुग्णालय |
| ६ | कु. पठाण शगुफ्ता ईरफान | खुला | १००००/- | वायसीएम रुग्णालय |
| ७ | श्री. गायकवाड अनिल शंकरराव | अनु.जाती | १००००/- | भोसरी रुग्णालय |
| ८ | कु. मन्तोडे अश्विनी भागवत | अनु.जाती | १००००/- | किवळे दवाखाना |
| ९ | श्री. ओवाळ निलेश राणु | अनु.जमाती (अनु.जाती) | १००००/- | भोसरी रुग्णालय |
| १० | कु. औंभासे ऋतुजा नितीन | भ.ज. (ड) | १००००/- | आकुर्डी रुग्णालय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | श्री. जगताप तेजस विलास | इ.मा.व. | १००००/- | खराळवाडी दवाखाना |
| १२ | सौ. कानडे सावित्री अमोल | इ.मा.व. | १००००/- | तालेरा रुग्णालय |
| १३ | कु. जाधव प्राची बाळकृष्ण | इ.मा.व. | १००००/- | पुनावळे दवाखाना |

**अटी व शर्ती -**

१. मानधनावरील सेवा कालावधीत आपणांस उपस्थित दिवसांचे एकवट मानधन विहीत केलेनुसार देण्यात येईल. मनपाच्या इतर कर्मचा-यांना लागु असणा-या इतर सुविधा, हक्क् व आर्थिक लाभ मिळणार नाही.

२. आठवडयातुन फक्त एक दिवस रुग्णालयाच्या सोयीनुसार साप्ताहीक सुटटी राहील. मानधन कालावधीत दीड महीन्यासाठी १ प्रमाणे एकुण ४ किरकोळ रजा देय राहतील व सार्वजनिक सुटटीच्या दिवशी बाहयरुग्ण विभागाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुटटी उपभोगता येईल.

३. कामकाजाची वेळ दवाखाना/रुग्णालयाच्या वेळापत्रकानुसार व रुग्णालयीन कामकाजाचे सोयीनुसार राहील.

४. मानधनावरील पदाचे कामकाज नेमणुक देणेत आलेल्या रुग्णालयात राहील व त्यावर संबधित प्रभारी वैद्यकीय अधिकारी/नियंत्रण अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

५. मानधनाचे पदावर काम करताना आपणाकडुन सर्वांना नि:पक्षपातीने वागणुक मिळणे आवश्यक आहे. कामासाठी दिलेल्या साहित्याची जबाबदारी आपणावर राहील.

६. मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसुचना कार्यालयास देणे आपणावर बंधनकारक राहील.

७. आपले काम समाधानकारक असलेस अथवा सेवेची मनपास आवश्यकता नसलेस कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास मानधनावरील नियुक्तीच्या पदाच्या जबाबदारीतुन मुक्त करणेत येईल.

८. एकत्रित मानधनाव्यतिरीक्त अन्य कोणतेही फायदे मिळणार नाहीत व मासिक मानधन सबंधित दवाखाना / रुग्णालयामार्फत अदा केले जाईल

९. नियंत्रण प्रमुखांचे सुचनेनुसार आवश्यकतेप्रमाणे कामकाज करणे बंधनकारक राहील.

१०. मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे मनपा आस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाहय दबाव आणणार नाही. कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करणार नाही याबाबत र.रु. १००/- स्टॅमपेपरवर नोटराईज्ड लिहुन द्यावे लागेल.

११. सदर कर्मचा-यांनी **दि. ११/०८/२०१४** पर्यंत वैद्यकिय मुख्य कार्यालयात रुजू व्हावे, सदर मुदतीत रुजू न झालेस तद्नंतर निवड समितीने तयार केलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नेमणूक देणेत येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(राजीव जाधव)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रति, श्री / श्रीमती ----------------------

प्रत -

१) लेखा विभाग
२) प्रशासन विभाग
३) ---------------------- दवाखाना / रुग्णालय

२/-रुग्णालयीन कामकाजाचे सोईच्या दृष्टीने अ.क्र.५ येथील कर्मचारी श्रीमती शिंदे पल्लवी पांडुरंग यांनी तुर्त यमुनानगर रुग्णालय येथे कामकाज करावे तद्नंतर रुपीनगर येथील दवाखाना कार्यान्वित झालेनंतर त्या ठिकाणी कामकाज करावयाचे आहे. तसेच अ.क्र.९ येथील कर्मचारी श्री.ओवाळ निलेश राणु यांना तात्पुरत्या स्वरूपात भोसरी रुग्णालय येथे नेमणूक देण्यात येत असून नव्याने सद्गुरुनगर येथे दवाखाना प्रस्तावित असलेने सदर दवाखाना सुरु झाले नंतर श्री.ओवाळ निलेश राणु यांनी सद्गुरुनगर दवाखाना येथे कामकाज करावे.

**आरोग्य वैद्यकिय अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.